**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** शेवगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0518 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/06/2023 01:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 15/06/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/06/2023
   **Time From (वेळेपासून):** 14:50 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/06/2023 **Time (वेळ):** 00:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/06/2023 00:45 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय शेवगाव येथील,आरोपीत हे बसत असलेल्या कक्षात,शेवगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अल्ताफखान ईमामखान पठाण

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1971

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नुराणी मशिद शेजारी, शालीमार ,कॉम्प्लेक्स नाईकवाडी ,नेवासा खुर्द,नेवासा, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नुराणी मशिद शेजारी, शालीमार ,कॉम्प्लेक्स नाईकवाडी ,नेवासा खुर्द,नेवासा, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788413319

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष सहदेव गर्जे | | | 1. जोहरापुर ,शेवगाव,शेवगांव, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 4000/ रूपये रोख रक्कम | 4,000.00 |

## 10 Total value of property (In Rs/-)
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

4,000.00

## 11.Inquest Report / U.D. case No., if any
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

## 12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद
शेवगाव पोलीस स्टेशन,
शेवगाव जि.अहमदनगर
दिनांक:- 16/06/2023

मी अल्ताफखान ईमामखान पठाण, वय 52 वर्षे, व्यवसाय- शेती, राहणार - नुराणी मशिद शेजारी, शालीमार कॉम्प्लेक्स, नाईकवाडी, नेवासा खुर्द,तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर, मो.नं. 8788413319 समक्ष हजर होवून फिर्याद लिहून देतो की, दिनांक 29/05/2023 रोजी माझे दोन मुले 1) मोजीम अल्ताफ पठाण, वय 33 वर्षे, 2) अजीम अल्ताफ पठाण, वय 30 वर्षे हे परवेझ असीफ पठाण याचेसह एमएच 16 सीक्यु 5409 या हयुंडाई क्रेटा गाडीमध्ये हिरा पान मसाला गुटख्याचा माल पांढरवाडी ता.गेवराई जि.बीड येथून घेवून येत असतांना दिषा अँग्रो इंडस्ट्रीज, भायगाव, शेवगाव येथे अहमदनगर एल.सी.बी.चे कर्मचारी यांनी गाडी पकडून शेवगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिष्टर नंबर 0445/2023 भारतीय दंड संहिता कलम 328,188,272,273,34 प्रमाणे गुन्हा दाखल केला असून त्यात 1) मोजीम अल्ताफ पठाण(माझा मुलगा), 2) अजीम अल्ताफ पठाण (माझा मुलगा), 3) परवेझ असीफ पठाण (माझा भाचा), 4) अल्ताफ इमामखान पठाण (मी स्वतः), 5) नाना उर्फ आदीनाथ अंकुष जाधव, रा. पांढरवाडी, ता.गेवराई जि. बीड (माल विक्रेता) व इतर असे आरोपी आहोत. सदर गुन्हयात 1) मोजीम अल्ताफ पठाण(माझा मुलगा), 2) अजीम अल्ताफ पठाण (माझा मुलगा), 3) परवेझ असीफ पठाण (माझा भाचा) यांना दिनांक 29/05/2023 रोजी तपासी अधिकारी श्री.आशिष शेळके, सहाय्यक पोलीस निरीक्षक, शेवगाव पोलीस स्टेशन यांनी अटक केली होती त्यानंतर दिनांक 01/06/2023 पावेतो ते पोलीस कस्टडीमध्ये होते त्यानंतर न्यायालयीन कोठडी मंजुर झाल्याने ते शेवगाव सबजेल येथे न्यायालयीन कोठडीत होते. त्यानंतर दिनांक 14/06/2023 रोजी त्यांना मा.शेवगाव न्यायालयाने सबजेल मधून मुक्त करण्यासाठी आदेश केला. मी त्यांना सोडवून घेण्यासाठी शेवगाव येथे असतांना त्यांना मा.न्यायालयाचे आदेशानुसार सोडण्याचे काम हे तहसिल कार्यालय, शेवगाव येथील फौजदारी काम करणारे महसुल सहाय्यक संतोष गर्जे यांचे असल्याचे खात्रीशीर रित्या माहित झाले. त्यामुळे मी त्यांना संपर्क केला असता, ते माझेकडे पैशांची अपेक्षा ठेवून असल्याने त्यांनी माझे दोन्ही मुलांना व भाच्याला न्यायालयाचा दुपारी आदेश झालेला असतांना देखील उशीरा मुक्त केले व मुक्त करतेवेळी मला सांगीतले की, मी तुमच्या मुलांना व भाच्याला सोडत आहे या मोबदल्यात तसेच त्यांना पुन्हा माझ्याकडेच चॅप्टरसाठी यायचे आहे त्यासाठी तुम्ही मला प्रत्येकी 2000/- रू . याप्रमाणे 6000/- रूपये दया, नाही तर परत चॅप्टरसाठी माझेकडेच येतील तेव्हा मी पाहून घेईल काय करायचे ते. त्यावेळी मी जास्त चर्चा न करता ठिक आहे, साहेब आता माझेकडे पैसे नाहीत मी उदया येतो असे म्हणून माझे दोन्ही मुले व भाचा परवेझ यांना घेवून निघून गेलो. मला तहसिल कार्यालय, शेवगाव येथील कर्मचारी संतोष गर्जे यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने व दि. 15/06/2023 रोजी तहसिल कार्यालय, शेवगाव येथे त्यांची भेट घेण्यासाठी जाणार असल्याने दिनांक 14/06/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, नाशिक येथे संपर्क साधला असता तेथील पोलीस निरीक्षक श्रीमती मीरा आदमाने यांचेशी माझे बोलणे झाले मी सांगीतल्या प्रमाणे त्या मला शेवगाव येथे दिनांक 15/06/2023 रोजी दोन पंच व सापळा पथकासह येवून भेटल्या. मी त्यांना दोन पंचासमक्ष माझी तहसिल कार्यालय, शेवगाव येथील फौजदारी काम करणारे महसुल सहाय्यक संतोष गर्जे यांचेविरूध्दची 6000/- रूपये लाच मागणीची तक्रार तोंडी सांगून माझे हस्ताक्षरात लिहून दिली.

मी दिलेल्या तक्रारी प्रमाणे शेवगाव तहसिल कार्यालयातील महसुल सहाय्यक संतोष गर्जे हे माझेकडे माझे मुलांना व भाच्याला सब जेल शेवगाव येथून सोडल्याचे मोबदल्यात तसेच त्याच्यावर होणार असलेल्या चॅप्टर कारवाईत मदत करण्यासाठी लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणेकामी पोनि/श्रीमती आदमाने यांनी पंच श्री. केवलसिंग पवार यांना माझे सोबत देउन माझेजवळ व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर

चालु करून देवून मला महसुल सहाय्यक संतोष गर्जे यांचे भेटीसाठी तहसिल कार्यालय, शेवगाव येथे रवाना केले. तेथे गेल्यानंतर बाहेर व्हीडीओ कॉन्फरन्स कक्ष असे नाव लिहीलेल्या रूममध्ये गेलो व तेथे संतोष गर्जे बसत असलेल्या कक्षात मी त्यांची भेट घेतली. त्यांचेत व माझेत झालेल्या संभाषणात त्यांनी माझेकडे काल सोडलेले किती व्यक्ती होते असे विचारले असता मी तीन असल्याचे सांगीतले त्यांनी प्रत्येकी 2000/- रूपये या प्रमाणे 6000/- रूपये लाचेची मागणी केली त्यावेळी मी तडजोड केली असता 4000/- रू. देणे बाबत नक्की झाले असून त्यांनी 4000/- रू. आणून देण्यास सांगीतले.

त्यानंतर पोनि/श्रीमती आदमाने यांनी लाच म्हणुन देणेसाठी लागणारी रक्कम उपलब्ध करून देण्यास सांगीतल्याने त्यांचेकडे मी 4,000/- रुपये ( 500/-रू दराच्या 8 चलनी नोटा ) हजर केल्या. त्यानंतर पोनि/श्रीमती आदमाने यांनी सापळा पथकातील सदस्या करवी अँन्थ्रासीन पावडर बाबत प्रात्यक्षीक दाखवून त्या रकमेस अँथ्रासीन पावडर लावुन त्या नोटा माझे पॅन्टला असलेल्या पुढील उजवे बाजुच्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर पोनि/श्रीमती आदमाने यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील इतर सदस्य यांना कारवाईच्या अनुषंगाने सुचना दिल्यात व त्यानंतर मला लोकसेवक संतोष गर्जे यांनी लाच स्विकारल्यानंतर इशारा करणे बाबत सर्वांसमक्ष सांगितले. त्यानंतर माझेसोबत पंच श्री.केवलसिंग पवार यांना दिले. माझेजवळ व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवून मला लोकसेवक संतोष गर्जे यांचे भेटीसाठी तहसिल कार्यालय, शेवगाव येथे रवाना केले. मी व पंच श्री.पवार असे शेवगाव तहसिल कार्यालय येथे फौजदारी काम करणारे महसुल सहाय्यक संतोष गर्जे बसत असलेल्या कक्षात जावून उभे राहिलो व त्यांचेशी कामाविषयी चर्चा केली त्यानंतर त्यांनी पडताळणी कारवाई दरम्यान मागणी केलेली लाचेची रक्कम 4000/- रूपये माझे पॅन्टचे खिशातून काढून लोकसेवक संतोष गर्जे यांचे समोर धरले असता त्यांनी ते त्यांचे उजवे हाताने स्विकारून दोन्ही हाताने मोजून त्यांचे टेबलवर असलेल्या कॉम्प्युटर मॉनीटरच्या स्टॅन्डखाली दाबून ठेवले त्यावेळी मी त्यांना सांगीतले की, आता मी 4000/- रू. दिलेले आहेत. माझे मुलांना चॅप्टरसाठी हजर करणार नाही त्यावर त्यांनी ठीक आहे म्हणून सांगीतले त्यानंतर मी बाहेर येवून सापळा पथकाने ठरवून दिलेला इशारा केला. त्यानंतर सापळा पथक आले व लोकसेवक श्री.संतोष गर्जे यांना पकडून त्यांचे नाव गाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव संतोष सहदेव गर्जे, वय 38 वर्षे, वर्ग-3, महसुल सहाय्यक, फौजदारी संकलन शाखा, तहसिल कार्यालय, शेवगाव जि. अहमदनगर असे सांगितले. त्यांचे टेबलवर असलेल्या कॉम्प्युटर मॉनिटरच्या स्टॅन्ड खालून लाचेची रक्कम 4000/-रू. पंचासमक्ष हस्तगत करण्यात आली.

तरी दि.15/06/2023 रोजी लोकसेवक संतोष सहदेव गर्जे, वय 38 वर्षे, वर्ग-3, महसुल सहाय्यक, फौजदारी संकलन शाखा, तहसिल कार्यालय, शेवगाव जि. अहमदनगर यांनी 14:50 ते 15:24 वा. चे दरम्यान माझे दोन मुलांना व भाच्याला सबजेल मधून सोडण्याची मदत केल्याचे मोबदल्यात व तहसिल कार्यालयात त्यांच्याकडे चॅप्टरसाठी गेल्यानंतर मदत करण्यासाठी प्रत्येकी 2000/- रूपये याप्रमाणे तिघांचे 6,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 4000/- रूपये स्विकारण्याचे मान्य केले व सदरची लाचेची रक्कम दिनांक 15/06/2023 रोजी 16:55 वा. शेवगाव तहसिल कार्यालयातील व्हीडीओ कॉन्फरन्स कक्षा मध्ये लोकसेवक संतोष सहदेव गर्जे बसत असलेल्या कक्षात लाचेची रक्कम 4000/- रूपये स्विकारले असता त्यांना अँन्टी करप्शन ब्युरो, नाशिक च्या सापळा पथकाने पकडले म्हणुन माझी संतोष सहदेव गर्जे, वय 38 वर्षे, वर्ग-3, महसुल सहाय्यक, फौजदारी संकलन शाखा, तहसिल कार्यालय, शेवगाव जि. अहमदनगर यांचे विरूध्द लेखी फिर्याद आहे.

माझी वरील टंकलिखीत केलेली फिर्याद मी वाचुन पाहिली असता ती मी सांगितले प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष　　　　　　ही फिर्याद लिहून दिली

दि.16/06/2023

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

vilas sahadu pulari(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): vilas sahadu pulari
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):